रोगनियंत्रण

# तुरीवरील खोडकुजव्या- पायकुजव्या रोग






पी.बी. खैरे
(मो.नं. ९६६५३०४४६७)
महात्मा फुले कृषी विद्यापीठ,
राहुरी, जि. अहमदनगर


तुरीच्या पिकावरील खोडकुजव्या/ फायटोफ्थोरा ब्लाईट (रोगकारक बुरशी : फायटोफ्थोरा ड्रेचस्लेरा) यांचा प्रादुर्भाव अत्यंत विनाशकारी असून, १ ते ७ आठवडे वाढलेल्या पिकामध्ये जास्त नुकसान होते. या रोगामुळे कमी कालावधीच्या पिकाच्या वाणामध्ये याचा प्रादुर्भाव जास्त आढळतो. सतत बरेच दिवस रिमझिम पडणाऱ्या पावसामुळे या रोगाचा प्रादुर्भाव लवकर होतो.

**लक्षणे** : पिकाच्या लहान रोपांवर फायटोफ्थोरा बुरशीमुळे रोपे कोलमडणे व मरणे सुरु होते. जमिनीलगत असलेल्या भागावर ही लक्षणे आढळतात. या रोगाचा परिणाम जमिनीखालील खोड व मुळे यावर होत नाही व जरी झाला तरी तो फारसा नसतो. जमिनीपासून वरच्या खोडाच्या १० ते २० सें.मी. उंच भागावर तपकिरी व कालांतराने काळे चट्टे पडतात. अगोदर ते उथळ असतात व कालांतराने ते आत दाबल्यासारखे होतात. असेच चट्टे फांद्यांवरही दिसतात.

**रोगाचा प्रसार** : मागील वर्षीच्या पिकाच्या शेतात राहिलेल्या रोगग्रस्त झाडांचे अवशेष (धसकटे) व रोगग्रस्त माती यामुळे रोगप्रसार होतो.



**व्यवस्थापन** : रोगग्रस्त झाडांचा समूळ नायनाट करावा. पिकामध्ये जास्त पाणी साचू देऊ नये. पेरणी करताना रोगप्रतिकारशक्ती असलेले बियाणे घ्यावे.

पायकुजव्या हा रोग स्क्लेरोशियम रोलफ्साय या रोगकारक बुरशीमुळे होतो.

**लक्षणे** : या रोगाची लागण पीक रोपावस्थेत असतानाच होते. पिकाचा जमिनीजवळील भाग हळूहळू कुजतो व कालांतराने झाडाच्या पानांना पाण्याचा पुरवठा न झाल्याने व बुरशीची लागण झाल्यामुळे ती पिवळी पडतात. या परिणामामुळे रोपे तग सोडून देतात, कोलमडून खाली पडतात आणि अकाली मरतात. जिथून झाड कुजायला सुरुवात झालेली असते त्या जागेवर पांढरीशुभ्र कापसासारखी बुरशी वाढते व नंतर तिची वाढ झाल्यावर ती मोहरीसारखी दिसते. शेतात आवाक्यापेक्षा जास्त पाणी सोडले असता या रोगाची वाढ झपाट्याने होते व पिकाचे नुकसान होते.



**व्यवस्थापन** : रोप अवस्थेत रोगाची लागण झाल्यास रोगग्रस्त रोपे काढून टाकावी व त्यांचा नायनाट करावा. (ती जाळून टाकावीत) ट्रायकोडर्मा या जैविक बुरशीनाशकाचा ४ ग्रॅम प्रतिकिलो असा पेरणीपूर्वी बीजसंस्कार करावा. ■